नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दि. ०१.०८.२०२६ ते दि. ३१.०८.२०२८ या कालावधीकरिता नाशिक जिल्हाधिकारी आस्थापनेवर स्वागत अधिकारी (वर्ग-३) या पदाऐवजी उपजिल्हाधिकारी (वर्ग-अ) संवर्गात ०१ पद तात्पुरते निर्माण करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१५७/पुनर्रचना**
पहिला मजला (मुख्य इमारत), मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६ जुलै, २०२६

**संदर्भ :-** विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र.मशा/कार्या-१/आस्था-१/DCNSK-११०५३/ ५४२/ २०२४-EST, दिनांक ०३.१२.२०२४.

**प्रस्तावना :-**

जिल्हाधिकारी नाशिक आस्थापनेवर स्वागत अधिकारी हे पद सन १९६३ पासून अस्तित्वात असून सदर पदामार्फत नाशिक भेटीस येणाऱ्या मा. मंत्री, वरिष्ठ अधिकारी, मा. न्यायाधीश, मा. विधिमंडळ सदस्य इत्यादी अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यांचे सुनियोजन व राजशिष्टाचारानुसार कामकाज केले जाते. सद्यस्थितीत दरवर्षी सरासरी ३०० अतिमहत्त्वाचे अतिथी नाशिक भेटीस येतात व दिनकालपरत्वे या दौऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे. आगामी सन २०२७ मधील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर देश-विदेशातील अतिमहत्त्वाच्या अतिथींच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ अपेक्षित असल्याने, सदर पद वर्ग-३ ऐवजी उपजिल्हाधिकारी (वर्ग-अ) संवर्गात तात्पुरत्या स्वरूपात रूपांतरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दरम्यान अतिमहत्त्वाच्या व महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटी मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता विचारात घेऊन, सन १९६३ पासून जिल्हाधिकारी नाशिक आस्थापनेवर अस्तित्वात असलेले स्वागत अधिकारी वर्ग-३ चे पद दि. ०१.०८.२०२६ ते दि. ३१.०८.२०२८ या कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरूपात रूपांतरित करून जिल्हाधिकारी नाशिक आस्थापनेवर उपजिल्हाधिकारी (वर्ग-अ) [वेतनश्रेणी : एस-२० (रु. ५६,१०० - १,७७,५००), ७ व्या वेतन आयोगानुसार] संवर्गात ०१ (एक) पद तात्पुरते निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

०२.	सदर तात्पुरत्या पदावरील वेतन व भत्ते यावर होणारा अंदाजित आवर्ती खर्च रु. १४.०१३ लक्ष (रु. चौदा लक्ष एक हजार तीनशे) प्रतिवर्ष एवढा अपेक्षित असून सदर खर्च स्वागत अधिकारी वर्ग-३ या पदाच्या लेखाशीर्षाखालील निधीतून भागविण्यात येईल.

०३.	निर्माण करावयाच्या तात्पुरत्या पदाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (रुपये) ७ व्या वेतन आयोगानुसार | पदांची संख्या | अंदाजित प्रतिमाह वेतन (रुपये) | वार्षिक खर्च (अंदाजे) (रुपये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | उपजिल्हाधिकारी | एस-२० (रु. ५६,१०० - १,७७,५००) | ०१ | १,१६,७७८ | १४,०१,३३६ |

०४.	सदर पद नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दि. ०१.०८.२०२६ ते दि. ३१.०८.२०२८ या कालावधीपुरतेच तात्पुरत्या स्वरूपात अस्तित्वात राहील. सदर कालावधी संपल्यानंतर सदर तात्पुरते पद आपोआप रद्द होईल व त्या जागी पूर्वीप्रमाणेच स्वागत अधिकारी (वर्ग-३) हे पद अस्तित्वात राहील.

०५.	सदर तात्पुरत्या उपजिल्हाधिकारी पदावर नियुक्ती करताना महाराष्ट्र नागरी सेवा (नियुक्ती, सेवाप्रवेश व पदोन्नती) नियम, १९८१ तसेच शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कार्यवाही करण्यात यावी.

०६.	सदरहू शासन निर्णय नवीन पदनिर्मिती, पदांचे पुनरुज्जीवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ०४.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार व वित्त विभागाच्या आपुक अनौपचारिक संदर्भ क्र.१७६/२०२६ दि.०८.०७.२०२६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१६१६२४४१६५४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT SOPANRAO DESHMUKH

Digitally signed by AJIT SOPANRAO DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D36A0A6455652C60EA76104DD537113A9CA67AB14A315B9CEFC36FC9BE2915F8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=704CB545C50221B15CDE7CCB8854E694C765DFB3A0240E891EBFB56EE79E3440, cn=AJIT SOPANRAO DESHMUKH
Date: 2026.07.16 16:25:34 +05'30'

**(अजित देशमुख)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रीडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व मंत्रालयीन विभाग यांचे अ.मु.स. / प्र.स. / सचिव.
९) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
१०) जिल्हाधिकारी, नाशिक.
११) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
१३) विभागातील सर्व कार्यासने.
१४) निवडनस्ती - पुनर्रचना कार्यासन.